1 MAR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाहिन्यांवरील एकारलेपणा चिंताजनक

## डॉ. उषाराणी नारायणी यांचे प्रतिपादन: शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषद उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

सांस्कृतिक बहुविविधता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे. प्रादेशिक दूरचित्रवाणी वाहिन्यांनी या बहुविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने कार्यक्रमांची रचना करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात मात्र 'बळी तो कान पिळी" या न्यायाने सांस्कृतिक एकारलेपणाचाच प्रचार त्यांच्याकडून सुरू आहे, हे धोकादायक आहे, असे प्रतिपादन म्हैसूर विद्यापीठाच्या माजी पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. उषाराणी नारायण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सव व आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'प्रादेशिक वाहिन्यांमधील महिला" या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषण करताना डॉ. नारायण बोलत होत्या. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के होते.



कोल्हापूर : कार्यशाळेचे झाडाला पाणी घालून उद्घाटन करताना प्र-कुलगुरु डॉ. शिर्के. सोबत डॉ. देसाई, डॉ. सोनल पांड्या, डॉ. अरुलचेल्व्हम श्रीराम, डॉ. चटर्जी, डॉ. भानावत, डॉ. वीरबाला अग्रवाल, डॉ. निशा पवार-मुडे व डॉ. चिंचोलकर.

डॉ. नारायण म्हणाल्या, प्रादेशिक वाहिन्यांमुळे बातम्या पाहणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय वाढली आहे. माध्यमांद्वारे त्यांची जी सार्वत्रिक प्रतिमा निर्माण केली जाते, ती मात्र अद्यापही लिंगभेदसापेक्षच आहे. सन १९८७ मध्ये हमलोग या दूरदर्शनवरील मालिकेद्वारे महिलांनी स्वातंत्र्य व समानतेचा संदेश घेतल्याचे सर्वेक्षण सांगते. आजतागायत महिलांच्या सामाजिक स्थितीत तीळमात्रही फरक पडला नाही. आरुषी हत्याकांड असो अगर पुलवामा हल्ला, त्यांच्या वार्तांकनातही ही लिंगभेदसापेक्षता प्रकर्षाने जाणवते. यातून दूरचित्रवाणीची असंवेदनशीलता दिसून येते. देशात जवळपास ८७७ हून अधिक वाहिन्या आहेत. कॉर्पोरेट कंपन्यांच्या हाती गेलेले माध्यमांचे नियंत्रण हा सुद्धा त्यातील कळीचा मुद्दा असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, माध्यमांना राष्ट्रीय विकासात योगदान देण्यास प्रेरित करण्यासाठी कृती आराखडा निर्माण करणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. मृणाल चटर्जी संपादित 'महात्मा गांधी एक पत्रकार आणि संपादक" या पुस्तकाचे प्रकाशन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. संतोष चव्हाण यांच्या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. स्मितील पाटील यांनी पाहुण्यांची काढलेली रेखाचित्रे भेट देऊन स्वागत करण्यात आले. अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मुंबई एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या डॉ. मीरा देसाई, अहमदाबादमधील गुजरात विद्यापीठाच्या डॉ. सोनल पांड्या, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. रवींद्र चिंचोलकर, चेन्नेई येथील अण्णा विद्यापीठाचे डॉ. अरुलचेल्व्हम श्रीराम, पुण्यातील इएमआरसीचे माजी संचालक डॉ. समीरण वाळवेकर, वरिष्ठ पत्रकार राजेंद्र हुंजे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे यांच्यासह संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2010
पुढारी

# 'नोकरीसाठी इंग्रजी संभाषण आवश्यक'

गडहिंग्लज : प्रतिनिधी

इंग्रजी ही जागतिक व्यवहाराची भाषा झाल्यामुळे यातून संभाषण करता येणे आवश्यक आहे. ज्याला हे संभाषण कौशल्य उत्तमरीतीने करता येते, त्यालाच आज सर्वाधिक नोकरीची संधी आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे इंग्रजी विभागप्रमुख व विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. अक्षय सरवदे यांनी व्यक्त केले.

येथील डॉ. घाळी महाविद्यालयात इंग्रज़ी विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. अनिल उंदरे यांनी स्वागत केले. डॉ. नागेश मासाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. प्रकाश बेळीकट्टी, प्रा. जयश्री तेली यांनी सूत्रसंचालन केले. निकिता नाईक यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# स्थानिक प्रश्नांना वाचा फोडल्याने येणारा काळ प्रादेशिक माध्यमांचा : प्रा. भानावत

## पत्रकारिता विभागातील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्थानिक व प्रादेशिक माध्यमांतून स्थानिक प्रश्नांना वाचा फोडली जात आहे. भाषा आणि संस्कृतीचा आदर, अस्मितांची जपणूकही याच माध्यमांतून होत आहे. त्यामुळे येणारा काळ स्थानिक आणि प्रादेशिक माध्यमांचा असेल, असे प्रतिपादन हरियाणातील एसजीटी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे अधिष्ठाता प्रा. संजीव भानावत यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात बोलताना प्रा. संजीव भानावत.**

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. यावेळी प्रा. ब्रेशील, डॉ. मृणाल चटर्जी, डॉ. उषा राणी नारायण, प्रा. सोनल पांड्या, डॉ. वीरबाला अग्रवाल उपस्थित होते. प्रा. भानावत म्हणाले, भारतीय पत्रकारितेला ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. बदलत्या स्थितीत माध्यमांचे स्वरूप बदलले आहे. स्थानिक भाषा, परंपरा आणि अस्मिता जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही माध्यमे करीत आहेत. स्थानिक माध्यमातून महिलांनाही मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

डॉ. उज्ज्वला बर्वे यांनी 'मराठी प्रादेशिक टीव्ही माध्यमांतील महिला' या विषयावर व डॉ. माधवी रेड्डी यांनी 'आंध्र प्रदेशातील टीव्ही माध्यमांतील महिलांची स्थिती' यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले. अनुराधा इनामदार यांनी आभार मानले.

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गगनबावडा : महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार करताना पी. एस. पांडव, सतीश देसाई आदी.

# स्त्रिया बंदनीय नसून वंदनीय : डॉ. पांडव

## डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात महिला दिन

गगनबावडा. प्रतिनिधी

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाच्या एन. एस. एस. व महिला सक्षमीकरण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च रोजी महिला दिन महाविद्यालय उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख वक्ते म्हणून उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव तर प्रमुख उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई, सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई तसेच, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा होते. आपल्या व्याख्यानामध्ये डॉ. पांडव यांनी स्त्रियांची सद्यस्थिती, त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी याचा वेध घेतला. तसेच त्यांनी आपल्या भाषणात असे प्रतिपादन केले की, स्त्रिया या बंदनीय नसून वंदनीय आहेत. त्यामुळे त्यांना प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. यावेळी प्रा. सतीश देसाई यांनी भारतीय विकासमध्ये स्त्रियांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. विद्या देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. आदिनाथ कांबळे यांनी केले. तर; सूत्रसंचालन प्रा. डी. के. पाटील यांनी तसेच आभार प्रा. डी. बी. भोसले यांनी मानले.